ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal



## SPECIAL ISSUE : V
## FEBRUARY - 2021

RTS | COMMERCE
IENCE | AGRICULTURE
UCATION | MANAGEMENT
DICAL | ENGINEERING & IT | LAW
ARMACY | PHYSICAL EDUCATION
CIAL SCIENCE | JOURNALISM

PRINCIPAL
Guru Buddhiswami Ma
Purna (Jn.) Dist.Par

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •
Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription : Rs. 1000/-

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Creation Of Khalsa : A True Illustration Of Guru Govind Singh's Progressive Spirit | Dr. Aneesa Iqbal Sabir | 1-7 |
| 2 | Role of NGOs in watershed development in Upper Man River Basin: A case study Of Man Deshi Foundation | Dr.Patil A.S.<br>Shri.Bandgar G. D. | 8-13 |
| 3 | Women Self-Help-Group And Micro-Entrepreneurship | Asst. Prof. Dr. (Mrs.) Clementine Julius Rebello | 14-18 |
| 4 | Impacts Of Covid 19 On Various Sectors And Rebooting The Economy Post-Lockdown | Dr. R. S. Salunkhe | 19-23 |
| 5 | Literacy Region in Beed District of Maharashtra State | Dr. Jitendra V. Ghodake | 24-27 |
| 6 | Kamala Markandaya and Indian Diaspora | Dr. S. S.Sasane | 28-31 |
| 7 | An Analytical Study of Cropping pattern and Operational Land Holding in Marathwada Region of Maharashtra | Dr.Landge Balwant Bhimrao | 32-36 |
| 8 | Social Change And TheVoccumIn The Production Of Literature | Pawar Sharad Subhashrao<br>Dr. Swapna C. Vyawahare | 37-40 |
| 9 | Covid-19 And Current Educational Scenario In India | Smt. Sradhanjali Swain | 41-47 |
| 10 | संत तुकारामांच्या अभंगातील समतेचा संदेश | प्रा.डॉ.बी.आर.दहिफळे | 48-51 |
| 11 | सुरेश शिंगटे यांच्या कादंबरीतील कृषी जाणिवा | बनकर माणिक नामदेव | 52-56 |
| 12 | प्रभाकर पेंढारकर यांच्या 'रारंगढांग' या कादंबरीतील व्यक्तिचित्रण (भाग दोन) | डॉ.चंद्रकांत रुद्राक्ष | 57-62 |
| 13 | मुक्ता साळवे यांच्या निबंधातील वाङ्मयीन विशेष | डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे | 63-68 |
| 14 | सुगावा मासिकाचेकार्य : एक अभ्यास | दीपक हरिदास कांबळे | 69-73 |
| 15 | मुक्या जीवाची कैफियत म्हणजे वृषभसूक्त | प्रा.डॉ.गजानन जाधव | 74-76 |
| 16 | १९८० नंतरची आदिवासी कविता | प्रा. के. आर. आढाव | 77-81 |
| 17 | लीळाचरित्रातील व्यक्तिचित्रण | नवनाथ किसन गुंड | 82-87 |
| 18 | लोकसाहित्य परंपरा एक अभ्यास' | प्रा.डॉ.निवृत्ती विनायक मिसाळ | 88-89 |
| 19 | सामाजिक भाषाविज्ञान : संकल्पना व स्वरुप | डॉ.प्रतीक्षा गायकवाड | 90-94 |
| 20 | अशोक कोळी यांच्या कादंबरीतील बंडखोर पुरुषपात्र : इसादास | प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यशवंते | 95-98 |
| 21 | मध्ययुगीन मराठी साहित्याची विविध प्रसारमाध्यमे | प्रा. डॉ. राकेश दे. कभे | 99-102 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरविषयक चरित्रात्मक कादंबऱ्यांचे स्वरूप | संजीव शिवाजी कांबळे | 103-107 |
| 23 | 'आदिवासी वीरनायक तंट्या भिल्ल' | प्रा.डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे | 108-110 |
| 24 | अण्णा भाऊ साठे यांची साहित्य व कलाविषयक भूमिका | [illegible] संभाजी साठे | 111-114 |
| 25 | १९७५ ते [illegible]खंडातील ग्रामीण कादंबरी | प्रा. [illegible] | 115-121 |


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# अशोक कोळी यांच्या कादंबरीतील बंडखोर पुरूषपात्र : इसादास

प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते
मराठी विभाग
श्रीगुरूबुध्दीस्वामी महाविद्यालय, पूर्णा(जं) जि. परभणी

**प्रस्तावना :**

कादंबरीमध्ये कथानकाप्रमाणे पात्रांनाही खुप महत्त्व असते. लेखकाने भोवतालच्या समाजात पाहिलेल्या व्यक्तीच अनेकदा पात्र म्हणून अवतरत असतात. त्यासाठी त्यांचे सभोवतालच्या परिस्थितीविषयीचे सुक्ष्म अवलोकन महत्त्वाचे असते. सुक्ष्म अवलोकन असेल तर पात्र जिवंत उभ्या राहतात. तात्पर्य, प्रभावी पात्र हे कादंबरीमध्ये महत्त्वाचे असते. यासाठी लेखक त्या पात्रांचे हावभाव, विशिष्ट लखबी, बोलण्याची विशिष्ट पध्दत इत्यादींचाही वापर करत असतो. याबाबत प्रा.बापट आणि गोडबोले म्हणतात, "मनुष्याचा जिज्ञासेचा अतिआवडता विषय मनुष्यच होय. कारण मनुष्यस्वभावातील अनेक गुणधर्मांशी तो पुष्कळदा स्वतःच्या स्वभावाची तुलना करीत असतो. जगातील कितीतरी व्यवहार मानवी .तींच्या प्रस्पर क्रिया–प्रतिक्रियांच्या मागे कोणत्या मनोवृत्ती भावनासंतती या विचारपरंपरा प्रेरक असतात हे जाणण्याचे त्याला अगत्य असते."[१] लेखकाच्या जिज्ञासा वृत्तीतून सभोवतालच्या व्यक्तीच प्रभावीपणे पात्र म्हणून अवतरत असतात, असे या विवेचनावरून म्हणता येईल.

कादंबरीतील कथानकाला पुढे घेऊन जाण्याचे महत्वाचे कार्य पात्रांमुळेच शक्य होते. कादंबरी हा वाड्मय प्रकार समाजजीवनाच्या समातंर चालणारा, समाज जीवनासोबत विस्तार पावणारा असतो. त्यामुळे समाजजीवनातील घडणा–या सर्वच घटनांशी व्यक्ती नानाविध प्रकारे निघडीत असतात. समाजाचे खरे चित्रण व्यक्तीमधूनच आकार घेते. व्यक्तीच्या .ती–उक्ती–विचार सतत स्थित्यंतरे पावत असतात. भोवतालच्या सर्व घटनांच्या मध्यस्थानी 'माणूस' असतो. पात्र घटकासंदर्भात ज्येष्ठ समीक्षक हरिच्चंद्र थोरात यांचे मताविचारात घेता येईल ते म्हणतात, "कथात्म लेखन करणारा कोणताही लेखक विविध पात्रांचे एक जग निर्माण करत असतो. या जगातील पात्रांचे परस्परांशी सबंध असतात. ते एकमेकांच्या संदर्भात काही .ती करत असतात. या पात्रांचे वर्तन अर्थातच काही मूल्यांना धरून होत असते, आणि या मूल्यांच्या परस्पर सबंधातून कादंबरीतील जगाची एक मूल्यव्यवस्था आकाराला येते. पात्रांच्या व्यवहारातील ही मूल्ये अपरिहार्यपणे लेखकाची मूल्ये असतात. लेखकाची असे म्हणता येणार नाही. मूल्ये कादंबरीतील मूल्यव्यवस्थेच्या हाताळणीतून जाणवू शकतात."[२] म्हणूनच कथात्मक साहित्यात पात्र हा घटक महत्वाचा मानला जातो. पात्रे व कथानक यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करताना जेष्ठ समीक्षक विजया राजाध्यक्ष म्हणतात, "कथानक व व्यक्तीरेखा पात्रे हे घटक कादंबरीच्या रचनेचे [illegible] असतात. ते कादंबरीच्या अशयानुसार बदलवतात."[३]



Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd. 1983
PRINCIPAL

प्रभावी व परिणामकारक पात्र रेखाटन हे अशोक कोळी यांच्या कादंबरी लेखनाचे एक महत्वाचे विशेष होय. पात्रांची निवड करताना त्यांनी फार बारकाईने व सुक्ष्म अभ्यास केल्याचा प्रत्यय येतो. प्रत्येक व्यक्तीरेखा डोळसपणे, जागरूकपणे निवडलेला दिसून येतो. म्हणून त्यांची पात्रे कादंबरीत लक्षणीय ठरतात. त्यांनी आपल्या विविध कादंब–यामधून उभ्या केलेल्या व्यक्ती वास्तव जीवनातून उभे केलेले आहेत. अशोक कोळी यांच्या अनुभवविश्वाचा परीघ व्यापक असून संवेदनशील वृत्ती, प्रतिभासामर्थ्य यांच्या आधारावर ते प्रभावी पात्ररेखाटन करताना दिसतात. त्यामुळेच त्यांच्या कादंब–यातील पात्रचित्रण त्यांच्या कादंबरी लेखनाची जमेची बाजू ठरते.

प्रस्तुत संशोधनपर लेखात अशोक कोळी यांच्या 'गावाच्या तावडीतून सुटका' कादंबरीमधील 'इसादास'या बंडखोर पुरूषपात्राचा विचार केलेला आहे.

**विषयविवेचन :**

अशोक कोळी यांच्या कथा, कादंबरीमधून संघर्षशील नायकाचे चित्रण अतिशय अल्प प्रमाणात दिसून येते. लढणारा, कणखर, बाणेदार वृत्तीचा, धीट नायक अशोक कोळी यांच्या साहित्यात मोजकेच आढळून येतात. याउलट प्रवाहासोबत जाणारे, अन्याय, अत्याचार सहन करणारे नायक मोठ्याप्रमाणात त्यांच्या साहित्यात पदोपदी भेटतात.

त्या मोजक्या नायकातील एक नाव म्हणजे 'इसादास'. पारंपारिकतेचा कास सोडून आधुनिकतेचा स्विकार करणारा 'इसादास' हा 'गावाच्या तावडीतून सुटका' या कादंबरीचा नायक आहे. अडाणी असूनसुध्दा तो आधुनिक विचारसरणीचा पुरस्कार करतो. पिढ्यान–पिढ्या आपण किती शोषिल्या गेलो हे त्याच्या लक्षात आल्यावर त्यातून सुटण्यासाठी मार्ग शोधणारा इसादास हा आजच्या तरूणांचा आदर्श आहे.

सखातात्या आणि बनाई यांचा एकुलता एक मुलगा इसादास. पारंपरिक विचार सोडून आधुनिकतेकडे जाण्यासाठी धडपडत असतो, पण पिढ्यानपिढ्यांपासून मालकाच्या दबावाखाली दबून राहिलेल्या सखातात्या व बनाईला हे पटत नसल्याने ते दोघेही त्याला विरोध करतात. इसादास वयात आल्याने आबासायबाकडून उचल घेऊन त्याचे लग्न थाटामाटात करून देतात. लग्न झाल्यावर मुलगा, सून, आणि आम्ही दोघे कामाला येऊन उचल फेडू असा शब्द आबासायबाला दिलेला असतो. पण लग्न झाल्यावर मात्र इसादास कामाला जायायचे नावही घेत नाही. तो स्वत: कामाला जात नाही व त्याच्या बायकोलाही जाऊ देत नाही. याविषयी बायकोला बोलताना तो म्हणतो, "हेच सांगनं हाये महे तुल्हे ! चांगले नि मालक लोक. खराब हाये नजर त्यांची. लय लय अन्याय, अत्याचार चालवला त्येंन्हं. गुपचूप सहन करनं पडून राहालं मजुराल्हें... दुसरा कोन्था चारा नही त्येंच्यापुढी... कशानं काय करतीन बिच्यारे... इरोध कशाले करतीन... जेन्हं विरोध केल्हा तो झाला समजा कोल्हाट... आशानं आसा हम करेसो कायदा... आशा मालकांपुढी कोन्ही कशाले बोलीन... आशानं आशे लय लय परकार हायती... ...ची काळजी, तो कामाला न

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

जाण्याचे कारण आता जिजाला समजली होती. इसादास निरक्षर असला तरी आपल्या कुटुंबाबाबत तो दक्ष असल्याचे दिसून येते.

इसादास स्वत: व आपल्या बायकोला आबासायबाच्या शेतात कामाला जाऊ न देण्याचे कारणही तसाच होता. आबासायबाची नजर बरोबर नव्हती. नविन लग्न झालेल्या मुलींवर त्याची वाकडी नजर राहत होती. गावातील अनेक मुली त्याच्या वासनेचे शिकार बनले होते. जिजाला मात्र आबासायबाचा शिकार बनु द्यायचे नाही, असे ठरवून इसादास आबासायबाविरूध्द बंड पुकारतो. संपूर्ण गावात इसादास एकटाच प्रस्तापितांविरोधात आवाज उठवत असल्याचे दिसून येते. गावातील इतर मंडळी मात्र अन्याय सहन करण्यातच आपली धन्यता मानताना दिसतात. इसादासवर गावातील कोणीही विश्वास ठेवत नाही. याच्यासोबत आपणही अडचणीत येऊ या मानसिकतेतून सर्वजण त्याच्यापासून दूर राहणेच पसंद करतात. एखादा अन्यायाविरूध्द आवाज उठवत असल्यास त्याला साथ देण्याची मानसिकता इथे दिसत नाही. प्रस्थापितांना न घाबरता, न डगमगता त्यांच्याशी एकांगी लढताना इसादासला पाहून तिर्थराज त्याला मदत करतो. तिर्थराज सुशिक्षित, आधुनिक विचारसरणीचा मागासवर्गीय तरूण होता. त्याच्या संपर्कात आल्याने इसादास शहाना झाला होता. पेपर वाचणे, टि.व्ही. वर बातम्या पाहणे, तालुक्याला जाणे, पुस्तकं वाचणे यामुळे त्याला आपल्या हक्क व अधिकाराची जाणीव झाली होती. तिर्थराजच्या मार्गदर्शनाने तो आपल्या बाबाला आबासायबाच्या विरोधात जाऊन जामनेरच्या दवाखान्यात इलाज करून आणला होता. तेंव्हापासून गावातील मंडळीही इसादासच्या बाजुने यायला लागली. त्यांना त्याचे म्हणणे पटू लागले. ते आबासायबाच्या विरोधात इसादासचे साथ देऊ लागले. शिक्षण हे वाघिनीचे दुध आहे, जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वाक्याचा प्रत्यय इथे येतो. साधा ढोरं चारवणारा इसादास तिर्थराजच्या मदतीने थोडाफार आपल्या कामापुरते शिकून हे बंड करतो. यावरून शिक्षणात असलेली ताकत इथे दिसून येते.

इसादास व तिर्थराज मिळून आबासायबाचा बंड मोडून काढायचे ठरवले होते. त्यामुळे तो आपले कुटुंब चालवण्यासाठी तिर्थराजच्या शेतात आपल्या बायकोसोबत कामाला जात होता. आपल्याला वेळ मिळेल तेव्हा आबासायबांचा अन्याय, अत्याचार लोकांना समजावून सांगत होता. आपल्या विरोधात गावात होत असलेल्या हालचालीमुळे आबासायब अस्वस्थ होतो. मजुरांची कोंडी करतो. मजुरांवर दबाव टाकतो. याचा कोणताही परिणाम मजुरांवर होत नाहीय कारण त्यांच्या पाठीमागे इसादास खंबीरपणे उभा होता. इसादासला मिळालेल्या मजुरांच्या साथीवरून तो त्यांना समजावण्यात यशस्वी झाल्याचे दिसून येते. इकडे शेतक–यांचे मात्र कोंडी होते. मजुरांविना त्यांचे कोणतेच काम होत नाही. संपूर्ण मजुरवर्ग गावाच्या वेशीबाहेर आपला मुक्काम हलवतात. इथे मजुरांच्या एकीचे आणि मालक वर्गाच्या गळचेपीचे दर्शन होते. मालकवर्ग आपल्या हाताने आपल्या पायावर दगड मारून घेतल्याची प्रचिती येते. इकडे वेशीबाहेर मजूरदार आपले गट तयार [illegible] मनाप्रमाणे मजूरी मिळवतात.

Co-ordinator
IQAC

Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mah...

कामाच्या मोबदल्यात मिळणारी मजूरी चांगली असल्याने मजुरदारांचा राहणीमान उंचावते. शासनाकडून मिळणा—या योजनांचा फायदा घेऊन मजूरदार आनंदात आपले जीवन जगतात. इसादासच्या प्रस्थापितांविरूध्दच्या बंडामुळे, त्याच्या आधुनिक विचारसरणीमुळे मजूरांचे पर्यायाने त्याचेही जीवनमान सुधारते. गावाच्या तावडीतून संपूर्ण मजूरांची सुटका होते.

अशोक कोळी यांच्या साहित्यात इसादाससारखे बंड करणारे मोजकेच पात्र आढळून येतात. त्यात— सुरेश, रामभू, विलास, संतोष असे पुरूषपात्र त्यांच्यावरील अन्यायाविरूध्द पेटून उठताना दिसतात. याशिवाय पुरूषपात्राबरोबरच काही बंडखोर स्त्री पात्रेही अशोक कोळी यांच्या साहित्यात आढळतात.

**निष्कर्ष :**

१) अशोक कोळी आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून कादंबरीतील पात्रे रेखाटले आहे.

२) अशोक कोळी यांच्या साहित्यात बंडखोर पुरूषपात्रे दुर्मिळ आहेत.

३) शिक्षणात अन्यायाविरूध्द लढण्याची ताकद असते हे सिध्द होते.

४) एकीचे बळ सामर्थ्यवान असते याची प्रचिती येते.

५) मार्गदर्शकामुळे कामाला योग्य दिशा प्राप्त होते. कामात अचुकता येते.

६) तिर्थराजच्या मार्गदर्शनामुळे इसादासाचे इप्सित साध्य होते.

७) तिर्थराजसारख्या निस्वार्थ तरूणाचे माणुसकी वाखानण्याजोगे आहे.

८) आजचा तरूण पारंपरिक चौकट तोडून आधुनिकतेकडे झुकत असल्याचे दिसून येते. हे समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे .

९) इसादास हा आजच्या तरूणांचा आदर्श आहे.

**संदर्भसुची :**

१. प्र. वा. बापट आणि वा. ना. गोडबोले : 'मराठी कादंबरी : तंत्र आणि वाटचाल' व्हिनस प्रकाशन, तृ.आ. १९७३ पृ. क्र.३९

३. हरिच्चंद्र थोरात : 'कादंबरीविषयी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००६, पृ. क्र. ९२.

४. विजया राजाध्यक्ष (संपा.) : 'मराठी कादंबरी आस्वादयात्रा'

५. अशोक कौतिक कोळी : 'गावाच्या तावडीतून सुटका', विजय प्रकाशन नागपूर, प्र. आ. २५ जून २०१८, पृ. क्र. ६८

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani